**नि.दि.दा. क्र. ६४/२०१९**
**करुणा वि. सखाराम व ईतर**
**CNR No.MHWS080007482019**

**<u>निशाणी क्र. २३ खाली आदेश</u>**
**(पारित दिनांक १२.०१.२०२४)**

वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला खारिज आदेश रदद करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांच्या कथनानुसार आजरोजी प्रकरण खारीज आदेशाकरिता असून वादीच्या वतीने वकील हजर आहेत. वादी क्र.०१ ही वयोवृध्द स्त्री असून वादी क्र.०२ व ०३ सोबत पुणे येथे राहते. न्हाणीघरात पडल्यामुळे मागील काही महिन्यांपासून वादी क्र.०१ आजारी असून ती न्यायालयासमक्ष येउ शकत नाही. वादी क्र.०२ व ०३ हे तिची देखभाल करीत आहे. वैदयकीय कारणामुळे वादी प्रकरणात हजर राहू न शकल्यामुळे प्रकरण खारीज आदेशाकरीता ठेवण्यात आले होते. त्यामुळे न्यायालयाने पारीत केलेला खारीज आदेश रदद करण्याची विनंती केली. याउलट प्रतिवादी क्र.०२ हजर असून त्यांनी सदर अर्जावर केवळ ''Strongly opposed'' असा शेरा नोंदविला.

**<u>०२</u>** दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. प्रकरण २०१९ सालाचे असून वादीने सदरचा अर्ज दिनांक १६.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर तिन्ही प्रतिवादींना नि.क्र. ०९ ते ११ नुसार समन्स तामील झालेले होते. परंतू प्रतिवादी क्र. ०१ न्यायालयात हजर झाला होता. त्याला संधी देवूनही त्याने जबाब दावा दाखल न केल्याने त्याचेविरुध्द दिनांक २८.०१.२०२० रोजी माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी विना जबाब दावा आदेश पारीत केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हे हजर न झाल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत केला होता. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने नि.क्र.१४ नुसार लेखी जवाब दाखल करण्याचा अर्ज दाखल केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ०२ याने नि.क्र.१७ नुसार लेखी जवाब दाखल करण्याचा अर्ज दाखल केला होता सदर अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आले होते.

**०३** परंतु नि.क्र.१४ आणि १७ ची पुर्तता करण्यात आलेली नसल्याने प्रतिवादींचे जवाब अभिलेखावर घेण्यात आले नव्हते. प्रतिवादी क्र.०१ ने नि.क्र.२० नुसार लेखी जवाब अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल करुन त्यावरील आदेशानुसार पुर्तता केली नाही. त्यामुळे नि.क्र.२० हा सुध्दा दिनांक २१.०६.२०२३ रोजी दाखल दप्तरी करण्यात आला. परंतु त्यानंतरही प्रकरणात नि.क्र.०५ वरील अर्ज प्रलंबित असतांना वादी आणि त्यांचे वकील सुध्दा गैरहजर होते. त्यामुळे प्रकरण खारीज आदेशाकरीता ठेवण्यात आले.

**०४** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अर्ज वादीच्या वकीलांनी आज दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.०२ सुध्दा हजर झाला आणि त्याने नि.क्र.२४ वर अर्ज दाखल करुन लेखी जवाब अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे. प्रकरणाचे स्वरुप बघता सदर अर्ज नामंजूर करण्याजोगा आहे. प्रकरण केवळ खारीज आदेशाकरीता लावण्यात आलेले आहे. परंतु अदयाप खारीज आदेश पारीत झालेला नाही. त्यामुळे आजरोजी दाखल केलेले वैदयकीय दस्तऐवज आणि प्रतिवादींची गैरहजेरी बघता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादीनी प्रकरण तत्परतेने चालवावे अन्यथा प्रकरण खारीज करण्यात येईल.

स्वा/-

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १२.०१.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H.A.Uchade (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 12.01.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 12.01.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 12.01.2024 |